नियमित दिवाणी दावा क्र. ६०/२०१६
सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय. ०९–०००१९५–२०१६

## निशाणी क्र. १८९ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज हा वादीतर्फे दाव्यात दुरुस्ती करण्यासाठी दाखल केला आहे.

२. वादीतर्फे कथन असे की, प्रतिवादी क्र.१ जयवंत मारुती सावंत हे दि.१४/०४/२०२५ रोजी मयत झाले असून त्यांना प्रतिवादी क्र.१अ व १ब हे वारस आहेत. सदर मयत प्रतिवादी क्र.१ च्या वारसांना मूळ दाव्यामध्ये समाविष्ट करुन दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी अशी वादीने विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर म्हणणे देऊन विरोध दर्शवला आहे.

४. अर्जाचे व म्हणण्याचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी तर्फे वकील यांचा युक्तीवाद ऐकला. दाव्याचे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत दावा वादी यांनी वाटप होवुन मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

५. प्रतिवादी यांच्या म्हणण्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यांनी मयत प्रतिवादी क्र.१ यांच्या मृत्यूच्या तारखेबद्दल कोणताही आक्षेप नोंदवलेला नाही. त्यामुळे वादी यांनी प्रतिवादी क्र.१ यांची दिलेली मृत्यू तारीख विचारात घेता प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी मुदतीत दाखल केला आहे. दाव्याचे स्वरुप पाहता, मयत प्रतिवादी क्र.१ यांच्या वारसांविरुध्द प्रस्तुत दावा पुढे चालवण्याचा अधिकार वादी यांना असल्याचे दिसून येते. तसेच, न्यायालयास परिणामकारक व परिपुर्ण निवाडा करताना आणि वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये असलेले वादाचे संपूर्ण निराकरण एकाच दाव्यामध्ये होणेसाठी न्यायतत्तवाच्या दृष्टीकोनातून प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. सबब, मी खालील प्रमाणे आदेश करत आहे.

## – आदेश –

१. अर्ज नि.क्र.१८९ मंजूर करण्यात येतो.

२. वादीने १४ दिवसांच्या आत सदर अर्जात नमुद केल्याप्रमाणे दावा दुरुस्ती करुन पुढील पुर्तता करावी.

SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI

Digitally signed by SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Date: 2025.09.18 12:09:05 +0530

( श्रीकांत एस. पचंडी )

दिनांकः १७/०९/२०२५ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड